<u>नियमित फौजदारी खटला क्र. १७/२०२२</u>

निशाण क्र. ३२ लगत

सरकारतर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – दिपक संभाजी कदम

वय – ४५ वर्षे, धंदा – शेती

निवासस्थान – रहाटेश्वर ता. देवगड जि. सिंधुदूर्ग.

**<u>शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती पाकजादे यांचेमार्फत–</u>**

१. मला कोणही कोठेही याकामा संदर्भात बोलविले नव्हते. याकामी मी काही केले नाही. आता मला दि. २७/०२/२०२२ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूराबाबत मला काही माहिती नाही. सहीस निशाणी क्र. ३३ देण्यात येते.

*<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजूर.</u>*

२. हे खरे आहे की, दि. २७/२/२०२२ रोजी देवगड पोलीसांनी देवगड पोलीस ठाणे येथे बोलविले होते. हे खरे आहे की, त्यावेळी आनंद ताम्हणकर हे हजर होते. हे खरे नाही की, त्यांनी त्यांच्या ताब्यातील दोन जंगली लाकडी दांडे पोलीसांसमोर हजर केले व ते पोलीसांनी जप्त केले. हे खरे नाही की, पोलीसांनी ते माझे समक्ष जप्त केले व सिलबंद केले. हे खरे नाही की, त्यावर आमच्या सहयांची लेबले लावली. हे खरे नाही की, या जप्तीचा पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा केला त्यामुळे मी त्यावर सही केली. आता साक्षीदाराला जप्त मुद्देमालातील अर्टीकल अ दोन दांडे दाखविले. ते माझ्यासमक्ष जप्त केलेले नाहीत. हे खरे आहे की, आरोपी माझ्या ओळखीचे आहेत. हे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपींतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री. के.के.मराठे यांचेमार्फत सुरु.</u>**

३. नाकारला.

श्रवणोत्तर स्वीकृत

(श्रीमती एन.बी.घाटगे)

दि. १७/०१/२०२४ न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड